# मुकुल माधव फाऊंडेशनच्या आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## दोनशे ज्येष्ठांची डॉक्टरांमार्फत आरोग्य तपासणी



कुडाळ : शिबिरात ज्येष्ठांची तपासणी करताना डॉक्टर.

**सातारा** / प्रतिनिधी

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. आणि त्यांचे सीएसआर भागीदार संस्था असलेल्या मुकुल माधव फाऊंडेशन यांच्यातर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित केलेल्या सर्वरोग निदान शिबिरात २०० ज्येष्ठांनी आपली आरोग्य तपासणी आणि निदान पुण्यातील प्रसिद्ध रुग्णालयातून आलेल्या तज्ञ डॉक्टरांकडून करुन घेतली. जावली तालुक्यातील कुडाळ प्राथमिक आरोग्य केंद्रात हे शिबिर संपन्न झाले. परिसरातील ज्येष्ठांना सर्वंकष आरोग्य सुविधा तज्ञ डॉक्टरांच्या हातून मिळावी, हा या शिबिरामागचा हेतू होता.

या शिबिरात एच. व्ही. देसाई रुग्णालयातून नेत्ररोगतज्ञ, ससून सर्वसाधारण रुग्णालयातून मानसोपचार तज्ञ, भारती विद्यापीठातील फिजिशियन, स्त्रीरोगतज्ञ आणि दंतरोगतज्ञ, नाक - कान - घसा तज्ञ आणि संचेती हॉस्पिलमधून हाडरोगतज्ञ आणि भौतिकोपचारतज्ञ यांनी शिबिरात ज्येष्ठांची तपासणी केली.

या शिबिरास मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे प्रत्येक महिन्यात एक शिबिर साताऱ्यात आयोजित करण्याचे आम्ही ठरविले आहे. सातारा जिल्ह्यातील शासकीय यंत्रणांनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच हे शक्य झाले, असे मुकुल माधव फाऊंडेशनच्या कार्यकारी विश्वस्त व अध्यक्षा रितू प्रकाश छाब्रिया यांनी सांगितले.

या शिबिराला मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कैलास शिंदे, सातारा जिल्हा परिषदेचे आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांचे सहकार्य लाभले. कुडाळच्या प्राथमिक आरोग्य केंद्राने आशा कर्मचारी, एएनएस आणि उपलब्ध आरोग्य अधिकाऱ्यांच्या मदतीने तज्ञ डॉक्टरांना मदत केली. सातारा जिल्हा रुग्णालयाने राष्ट्रीय आरोग्य मोहिमेअंतर्गत (एनएचएम) रक्तशर्करा चाचणी पुरवली होती. या शिबिरास जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष वसंतराव मानकुमरे, पं.स. सदस्य सौरभ शिंदे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहिते, कुडाळ केंद्राचे डॉ. रासकर, डॉ. मिरजकर, डॉ. शेलार, कुडाळचे सरपंच शिंदे उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी मुकुल माधव फाऊंडेशनच्या बबलू मोकळे, यास्मीन शेख, जितेंद्र जाधव, फिनोलेक्सचे संतोष शेलार, अभिषेक चौगुले यांनी विशेष परिश्रम घेतले.